दिनांक : २४.०१.२०२०

निविदा पूर्व बैठकीचे (Pre-bid ) इतिवृत्त

यशदातील PHOTOCOPY & DIGITAL PRINTING SERVICES FOR THE YEAR 2020-2022 या कामासाठी दिनांक २०.०१.२०२० ०३.०२.२०२० या कालावधीमध्ये ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने निविदादारांच्या शंका समाधानासाठी दिनांक २४.०१.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता निविदा पूर्व बैठक (Pre-bid Meeting) आयोजित करण्यात आली होती.

०२ सदर बैठकीसाठी खाली नमुद करण्यात आल्यानुसार यशदाचे प्रतिनिधी तसेच निविदादार/प्रतिनिधी हजर होते.

| अ क्र | बैठकीसाठी उपस्थित असलेले यशदाचे प्रतिनिधी |
|---|---|
| ०१ | श्री एस. एस. तडकसे, वित्तीय सल्लागार |
| ०२ | श्री सदाशिव पाटील, निबधंक |
| ०३ | श्री डी. आर. शेळके, प्रमुख प्रापण व लेखाधिकारी |
| ०४ | श्री वि. उ. कटकधोंड, सहायक निबंधक |

| अ क्र | निविदादार/प्रतिनिधी |
|---|---|
| ०१ | श्री अविनाश लक्ष्मण तपासे, गजानन इमेजिंग प्रिंट सोलुशन, अंधेरी, मुंबई |

०३ निविदा पूर्व बैठकीसाठी (Pre-bid Meeting) उपस्थित असलेले निविदादार / प्रतिनिधी यांना प्रमुख प्रापण यांचेकडून प्रथम ई-निविदेबाबत अवगत करून देण्यात आले व याबाबत काही शंका असल्यास विचारण्यात यावेत असे त्यांना सांगण्यात आले. यावर यांचेकडून विचारणा करण्यात आलेले मुद्दे व त्यावर यशदाकडुन करण्यात आलेला खुलासा खालील प्रमाणे

| अ क्र | उपस्थित मुद्दे | यशदाकडुन करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| ०१ | झेरॉक्स्च्या प्रतींचा ट्रक कसा ठेवायचा व प्रत्येक विभागाऐवजी प्रत्येक मशीननुसार देयके सादर केली तर चालतील का ? | ई-निविदेतील General Terms & Conditions मधील अट क्रं. १० नुसार ठेकेदाराने यशदातील प्रत्येक विभागाकडे झेराक्स् काढण्यासाठीचे स्लीपबुक द्यावयाचे असुन त्या स्लीपांच्या आधारे झेरॉक्सच्या प्रतींचा हिशोब ठेवण्यात येवून त्याआधारे ठेकेदाराने देयक सादर करावयाचे आहे. तसेच त्यांनी त्यांच्या सोयीसाठी त्यांच्याकडे नोंदवहीसुध्दा ठेवु शकतात.<br>तसेच ई-निविदेतील General Terms & Conditions मधील अट क्रं. १० नुसार देयके प्रत्येक विभागाच्या विभागप्रमुखाकडेच सादर करणे आवश्यक आहे. अट क्र. ११ नुसार देयक अदा करण्याची कार्यवाही त्या त्या विभागामार्फत करण्यात येईल असे सांगण्यात आले. |
| ०२ | झेरॉक्स् सेवेसाठी कर्मचारी किती नेमावयाचे ? | यशदामध्ये झेरॉक्स् कक्षासाठी नेमुन दिलेल्या ठिकाणी किमान तीन झेरॉक्स् मशीन्स् ठेवणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक विभागामध्ये सध्या उपलब्ध् असलेल्या ठिकाणी सहा मशीन्स् अशा एकूण नऊ मशीन्स् यशदामध्ये ठेवाव्या लागतील. तसेच नव्याने कुठल्या विभागाकडुन मशीनची मागणी करण्यात आल्यास त्या विभागास मशीन पुरवावे लागेल. यशदातील झेरॉक्स्च्या कामाची गैरसोय होणार नाही. या सर्वाचा विचार करून ठेकेदारांनी आवश्यक कर्मचारी नेमावयाचे आहे. नेमण्यात येणा-या कर्मचारी यांची संपुर्ण जबाबदारी ही ठेकेदाराची असेल. सदर कर्मचा-यांचा यशदाशी काहीही संबंध राहणार नाही, असे अवगत करण्यात आले. |

०४ वरील प्रमाणे निविदादारांच्या शंकाचे निरसन करण्यात आले व उपस्थित निविदादारांचे आभार मानण्यात येवून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले,

(सहायक निबंधक) (प्रमुख प्रापण व लेखाधिकारी) (निबंधक) (वित्तीय सल्लागार)